## नि. क. ३५ खालील आदेश

१ प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी दिलेला आहे. अर्जातील कथनानुसार प्रस्तुतचा दावा वाटपासाठी व मनाईसाठी दाखल करण्यात आला. अर्जातील कथनानुसार मूळ पुरुष व बाळूबाई मयत असल्याबाबत तसेच दावा मिळकतीच्या वर्णनाबाबत व वादी क्र. १ यांचे लग्न आप्पा गोरड यांचेसोबत झालेबाबतचा मजकूर तसेच फेरफार क्र. ६१४ व इतर सार्वजनिक कागदपत्रांबाबत त्याचप्रमाणे हक्कसोडपत्राबाबत अतिरिक्त मजकुर वादपत्रात नमूद करण्याचे नजरचुकीने राहून गेल्यामुळे मागणी केलेली दुरुस्ती मंजूर करणेत यावी अशी विनंती केली.

२ प्रतिवादीने सदर अर्जास हरकत घेतली असून प्रतिवादीच्या कथनानुसार मागणी केलेल्या दुरुस्तीप्रमाणे बाबींची माहिती वादीला पुर्वीपासून होती तेव्हा दाव्यातील उणिवा भरुन काढणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दिल्यामुळे तो नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

३ वादीतर्फे श्री गाढवे तर प्रतिवादीतर्फे श्री खोल्लम वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांची पडताळणी केली. पुढील मुद्‌दे उपस्थित होत असून त्याचे निष्कर्ष कारणासहीत पुढीलप्रमाणे नोंदवत आहे.

| **अ. क.** | **मुद्‌दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी हा मागणीप्रमाणे दुरुस्तीसाठी पात्र आहे का ? | **नकारार्थी** |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणेमिमांसा

**मुद्‌दे क. १ व २ साठी** :—

४ प्रस्तुत प्रकरणात परिस्थितीचा विचार करता वादीने पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. प्रस्तुतचा दावा वाटपासाठी व मनाई साठी दाखल करणेत आला आहे. निशाणी २९ प्रमाणे मुद्‌दे काढण्यात आले. वादीने नि. ३४ प्रमाणे दिनांक २७/७/२०१६ रोजी पुराव्याचे शपथपत्र दिले आहे. दावा उलटतपासाठी प्रलंबित असताना प्रस्तुतचा अर्ज देण्यात आला.

५ दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ च्या परंतुकानुसार दाव्यातील सुनावणी सुरु होण्यापुर्वी मागणी केलेली दुरुस्ती का करण्यात आली नाही याचे समाधानकारक कारण स्पष्ट केल्या खेरीज अर्ज मंजूर करता येणार नाही. प्रस्तुत प्रकरणात वादीने केवळ नजरचुकीने व हस्तदोषामुळे तसेच टंकलेखकाच्या चुकीमुळे मागणी केलेली

दुरुस्तीचा मजकुर वादपत्रात लिहीण्याचे राहून गेले असे कारण नमूद केले आहे. प्रस्तुत अर्जातील मागणी केलेली दुरुस्ती विचारात घेता दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये, मूळ पुरुष मयत असल्याबाबत तसेच वादी क्र. १ च्या लग्नाबाबत व सार्वजनिक कागदपत्राबाबत दुरुस्ती मागणी केली आहे. सदर सर्व बाबी वादीच्या माहिती मध्ये असलेल्या आहेत. अशा परिस्थितीत पुराव्याचे शपथपत्र दाखल केल्यानंतर सुध्दा वादपत्रात सुधारणा करणेची आहे हे लक्षात आलेले नसताना प्रस्तुतचा अर्ज उलटतपासणीच्या वेळी देण्यात आला त्याचे कारण संबंधित वादीने स्पष्ट केलेले नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता मागणी केलेली दुरुस्ती करणेसाठी परवानगीसाठी वादी पात्र नसल्याचे स्पष्ट होते. सबब मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ साठी पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

अर्ज नामंजूर करण्यात आला.

**दिनांक २१/९/२०१६**

**सुमित वि. जोशी**
**सह दिवाणी न्यायाधीश क. स्त., दौंड**
**जि. पुणे**